भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१९/०८/२०१६

१)विनापरवाना शस्त्र बाळगतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १७/०८/२०१६ रोजी २१.५० वा. दर. यातील आरोपी हा आपल्या हातात लोखंडी धारदार तलवार (शस्त्र) धरुन घरासमोर सार्वजनीक रोडवर शिविगाळ, धामधुम करतांनी मिळुन आल्याने त्याचे कब्जातुन विनापरवाना १ लोखंडी तलवार कि. १००/–रु. ची मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४, २५ भा.ह.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दांदळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–

दिनांक १५/०८/२०१६ रोजी १५.०० ते १७/०८२२०१६ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही सरपंच ही म्हणुन कार्यरत असुन ग्राम सभा सुरु असतांना सार्वजनीक ठिकाणी यातील आरोपीने अश्लिल शब्दात शिविगाळ केली व दि. १७/०८/२०१६ ला सार्वजनीक ठिकाणी 'आरोपीने फिर्यादीस केव्हाची तु सरपंच झालीस' असे म्हणुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

३) अल्पवयीन मुलीने विष प्राशन केल्याने मृत्यु . :–

दिनांक १८/०८/२०१६ रोजी ०६.४५ वा. दर. यातील मृतक कु. रक्सीका पुरुषोत्तम मेश्राम वय १५ वर्ष, रा. सिल्ली हीने विष प्राशन केल्याने तिला उपचाराकरीता सा. रु. भंडारा येथे नेले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ मेमो वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी सफौ . नान्हे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

४) संडासच्या टाकी मध्ये इसमाचा मृत्यु . :–

दिनांक १८/०८/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील फिर्यादीचा मुलगा मृतक राहुल राजु भोयर रा. खात रोड भंडारा हा नविन घराचे बांधकामा करीता ठेकेदार माधव ऊधाजी ईश्वरकर रा. खैरी बेटाळा यांचे कामावर घर मालक सुनिल मधुकर मिरासे रा. किसन नगर खात रोड भंडारा यांचे नविन घराचे संडासाचे नविन टाक्याचे बांधकाम करीत असता टाक्यातील दुस–या पार्ट मधील सेंट्रीगच्या पाटया काढण्यास जात असता आतील पार्टच्या दरवाज्यात कंबरभर पाण्यात किचड साचला असल्याने किचडात पाय फसुन समोर जात असल्याने पुढच्या पार्ट मध्ये असलेल्या बल्लीला दुसरा पाय फसल्याने त्याला निघता न आल्याने तो संडासचे टाक्यातील पाण्यातील किचडात फसुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादीचे राजेश शिवराम भोयर वय ४५ वर्ष, यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

(श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.